
स्वीटी महाले
फुंकरीची वादळे
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

## स्वीटी महाले

लिखित

दीर्घकथा

# फुंकरीची वादळे





# फुंकरीची वादळे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.



# फुंकरीची वादळे

स्वीटी महाले

पत्ता- मु. पो. बेलापूर, तालुका : अकोले, जिल्हा : अहमदनगर

फ़ोन : 8308732305

मेल : sweetimahale2018@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.





प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३ ऑगस्ट २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.





मी स्विटी सुभाष महाले .

पोस्ट बेलापुर ता. अकोले. जि. अहमदनगर

.द.जा.मालपाणी का॑लेज संगमनेर मधे सध्या मी पदविच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत आहे.

आता स्वतःविषयी काय सांगु सांगायला जास्त काही नाही. लिहीण्या वाचण्याची आवड आहे. आतापर्यंत बरंच वाचन केल आहे. मात्र लेखक म्हणुन नविनच. आणि बरंच काही लिहूनही कधी काही प्रकाशित केलं नाही. जे जे नवीन वाचनात येईल ते मला आवडतं. त्या मुळे हातात पडलेल्या पुस्तकाचा लेखक आवडता होऊन जातो. मराठी हिंदी इंग्लीश जो प्रकार हातात येईल तो आवडता. मग विषय कोणताही असो.

लिखाणातही मला वेगवेगळे विषय हाताळायला आवडतात. पण अजून बरंच काही शिकायचं आहे. ई साहित्य च्या वाचकांसमोर पहिल्यांदा येतेय. वाचकांसाठी थोडा वेळ करमणूकीचा हा छोटासा प्रयत्न. तुमच्या भेटीला येताना खुप आनंद होतोय. आणि टेन्शनही. होप सो की माझं लिखाण तुम्हाला आवडेल. अगदी नवखी आणि माझा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे चुका नक्कीच जाणवतील. पण तुम्हाला काय वाटलं ते मला नक्की सांगायचं हं .. निदान पुढे लिहावं कि इथेच थांबू एवढं समजलं तरी खुप मदत होईल.. sweetimahale2018@gmail.com हा माझा मेल किंवा मला आपण फेसबुक वरही पाहू शकता.



अर्पणपत्रिका

माझी सगळयात पहीली वाचक आणी माझी गाईडींग स्टार माझी मनुताई आणि  लिहायला लागलं तर अजुन एक पुस्तक तयार होईल अशा अनलीमीटेड लिस्ट असलेल्या माझ्या सगळया फ्रेंडस ना...

कुणाचंच नाव लिहीत नाही ...

डेडीकेटेड टु ऑल बेस्टिज....

स्वीटी महाले





# फुंकरीची वादळे

स्वीटी महाले





"Woooow...."

...म्हणत मी गाडीतुन खाली उडी टाकली.

"आत्तू.. !!!!!" मी आत्तूला एवढी जोरात मीठी मारली कि तिला श्वास घेण अवघड झालं.

"अगं अगं.. हळु! मला मारतेस कि काय!! आधी तर वर्ष वर्ष तोंड दाखवायचं नाही आणि मग अचानक येऊन हे असं.."

आत्तु माझ्यावर रागवली होती. कारणही तसंच. आज जवळ जवळ तीन वर्षांनंतर मी आत्यांकडे आलेली. 12वी नंतर बाहेर अँडमीशन घेतलं. graduation ची ती तीन वर्ष जणु अज्ञातवासातच गेलेली.. पाहुण्यांकडे येणं जाणं तर नसल्यातच जमा. त्यात आत्याचं घर कोकणात. मग काय फोनवरच काय ते बोलणं.. पण माझ्या येण्याने आत्तु खुप खुश झालेली.

"साँरी ना आत्तु" मी मी हळुच कान पकडले. !!

आत्तु गालात हसली. आल्या आल्या तिने माझी दिष्ट काढली..

"काय आत्तु हे!!?? आता मला कुणाची दिष्ट लागणारे??"





मला अशा गोष्टींवर विश्वास नाही हेही आत्तुला चांगलं माहीत होतं म्हणून कि काय तिने मला एका हाताने पकडून धरलेलं.

“तनु!!!!” तिने माझ्याकडे बघत डोळे मोठे केले.

आता मलाही शांत उभं राहण्याखेरीस पर्याय नव्हता..

“मामा!!!” मी त्रासीक चेहऱ्याने मामांकडे पाहीलं.

तेही मला चिडवायच्या स्वरात म्हणाले.. “असुद्या सुनबाई आता सवय असु द्या”

असं म्हणत त्यांनी घराच्या टेरेसकडे पाहीलं.

तिथे कोणतरी उभं होतं थ्रि-फोर पँट आणि टि-शर्ट.. छान कोरून केलेली दाढी.. छानसे कापून व्यवस्थित बसवलेले केस..

“आय्या हा कोण!!??”

मला ओळखायला जरा वेळच लागला.. मी तब्बल पाच वर्षांनी त्याला पाहत होते. तो माझ्यापेक्षा 2 वर्ष मोठा होता....... गीरी.... माझ्यासारखा तोही higher studies साठी बाहेर गेला दहावीनंतर असा काही विशेष संबंध नव्हता.. माझ्यापेक्षा तो फारच लाजाळू. लहान असताना खुप खेळायचो आम्ही. पण जस जसं मोठ होत गेलो.. सगळं मागे पडलं.. आत्याला तशी दोन मुलं. एक मोठा मुलगा गीरी आणि एक मुलगी गौरी.. ती माझ्याच वयाची.. मामांची नोकरी असल्या कारणाने ते10 वर्षापुर्वी कोकणात शिफ्ट झाले..

पण कोकण बाकी सुंदर...

“हां! आत्तु, मस्त निसर्गाच्या कुशीत इथेच येऊन रहावं असं वाटतं.” मी आत घरात जात म्हटलं.





"मग रहा कि कायमची.." आत्तु ने मला हळुच डोळा मारला.

"आत्तु मला त्या लाडु च्या नावाने चिडवु नको. plzzz.. मी त्याला लहान असताना चिडवायचे. कारण तो खुप गोलु मोलु होता. म्हणूनच कि काय त्याला ओळखायला मला ऊशीर लागला. अरे पण गौरी कुठय!! मी एवढ्या लांबुन आले आणि ही बाहेसुद्धा आली नाही."

"अगं आत किचनमधे असेल तुझ्या आवडीची मच्छी बनवतेय.."

" .. waaaaw" नाव ऐकुणच माझ्या तोंडाला पाणी सुटलं...

"गौरी!!!!!" मी बॅग टाकून किचनमधे पळाले.. मी मागून जाऊन गौरीला मीठी मारली.. ती एवढ्या जोरात दचकली कि मी झटका बसल्यासारखी मागे सरकले..

"अगं गौरी मी आहे तनु.. किती घाबरतेस!!"

"अगं नाही गं तू अशी अचानक आली म्हणून.. बघ ना तुझ्यासाठी एवढं बनवत बसले आणि तू आल्याचं सुद्धा लक्षात आलं नाही.." ती हसत म्हणाली..

"मग तयार आहे का जेवण? मला ते कधी माझ्या पोटात घालते असं झालंय."

"आलमोस्ट रेडी...." ती पुन्हा गालात हसत म्हणाली..

आत्याही तोपर्यंत आत आली तिने माझ्यासाठी गरम गरम ताट केलं.. तिथेच गप्पा मारता मारता मी त्यावर ताव मारला..

"गौराबाई, सुगरण झालीस गं तु. मी तर अजून पोळयाच लाटायला शीकतेय!!"

"डोन्ट वरी! मी शिकविन तुला." तिने माझ्या रीकाम्या ताटात पुन्हा वाढलं..





"अगं बस बस! खाऊ घालून मारते कि काय आता? मी त्या लाडु सारखी होईल ना!!"

"आता लाडु पहील्यासारखा नाही राहीला. काय तू पाहीला ना मघाशी??"

"हो गं! बारीक झालाय खरं!! मस्त डोले शोले जीम करतो वाटतं रोज..."

"हो! न चुकता..." आत्तु कौतुकाने म्हणाली.

"आता कुठे गेला?? मी घरभर नजर फिरवली."

"आता तू आलीस. त्याचा घरात पाय टिकेल तर खरं!!.."

"म्हणजे काय? मला काय भुत बित समजतो कि काय हा?? मी जातेच मग" मी गमतीने म्हणाले.. त्यावर दोघही हसल्या!!

"... अ.... ह. आलं कि लगेच आपली जायची घाई!!"

"अगं आत्तू मी चांगली महीनाभर राहणारे. तुम्हालाच कंटाळा येईल. मग तुच विचारशील केव्हा जातीय!!!"

पुन्हा तीघीही हसलो.. हसता हसता अत्तू चा चेहरा अचानक गंभीर झाला. "बरं झालं त्या निमीत्ताने गौरीला पण सोबत होईल!!"

"सोबत कसली??" मी विचारलं.

"अगं असंच गं. दिवसभर चांगली करमणुक होईल!! चल मी तुला माझी रुम दाखवते!!" गौरीने मला ओढतच आत नेलं... बराच वेळआम्ही गप्पा मारल्या. प्रवासाने खुप थकलेली. संध्याकाळी केव्हा झोप लागली कळलंच नाही.





रात्री दहाच्या दरम्यान पुन्हा जाग आली. 'अरे! मला झोप कधी लागली??' मोठा आळस देत स्वतःशीच पुटपुटले.. ऊठून बाहेर आले. सगळे रात्रीचं जेवण घेत होते.

“ऊठलीस का? ये जेऊन घे!!” आत्याने पुन्हा माझं ताट वाढायला घेतलं.

“ नको गं पोटात जागा तर हवि ना.. !! गिरी दिसत नाही??”

“अगं तो वर असेल बघ!!”

“बरं बरं” मी वर जात म्हणाले. मनात म्हटलं आता कसा सापडेल!!बघतेच मला बघून कायम पळतो. मी पळतच जिना चढला.. तिथे मात्र कुणीच नव्हतं. मी कोपऱ्यातल्या माझ्या आवडीच्या जागेवर ऊडी टाकली.. मग मोठा श्वास घेतला मस्त थंड हवा सुटलेली झाडांची सळसळ ऐकायला येत होती. तेवढ्यात कुणीतरी धडधड जीना चढत वर आलं. तो गीरी होता. माझी आवडती जागा थोडीशी कोपऱ्यात म्हणजे जरा जास्तच कोपऱ्यात होती. त्यामुळे त्याला दिसलं नसाव कदाचित. पण मला तो स्पष्ट दिसत होता. आजुबाजुला चोरटी नजर टाकत त्याने सिगारेट पेटवली. मी मनात म्हटलं 'कसा चोर पकडला!!'

मी मोठ्याने म्हटलं.. “हे कधी पासून????”

तो माझा माझा आवाज ऐकून एवढा घाबरला कि झटकन तोंडातली सिगारेट खाली फेकून दिली.. त्याचं ते केविलवाणं तोंड पाहून मला एवढं हसायला आलं की मी कितीतरी वेळ पोट धरून हसत होते..

“त... तनु?? तु?? अ.. मी रोज नाही घेत. शप्पथ! आईला सांगु नको प्लीज!!! पुन्हा नाही घेणार तुझी शप्पथ!”





“ये माझी शपथ घेतोस मरेल ना मी..” मी हसतच म्हटलं.. “बरं बरं नाही सांगत. !!!”

“हुशशश मला वाटलं आता ओरडते कि काय आत्तू आत्तू!!” तो माझी अँक्टींग करत म्हणाला..

“माझी अँक्टिंग करतोस? सांगु का सगळयांना ???”

“ए नको गं बाई! सॉरी सॉरी !! आता नाही करणार. तुला लहानपणी सवय होती ना चुगल्या करायची.”

“बरं! बरं!” मी पुन्हा रागाने पाहीलं.. कान पकडून तो खाली पळाला.. मी अजूनही हसतच होते. नंतर बराच वेळ मी तिथेच घालवला. मग मीही झोपायला पळाले..

रात्री अचानक कुणाच्यातरी ओरडण्याने जाग आली, माझ्या खोलीशेजारी गौरीची खोली होती..... गौरी??? हो.. तो गौरीचाच आवाज होता मी पळतच तिच्या रूममधे पोहोचले. गौरी भितीने थरथरत भींतीला टेकून उभी होती. घरातील बाकी लोकही आले. भितीने तिच्या तोंडातुन शब्दच निघेना. आआई.. ती भींतिकडे थरथरत्या नजरेने बघत होती. होती.. मी त्या बाजुला पाहीलं पण तिथे काहीच नव्हतं. जसं काही ते तिलाच दिसतंय. ती एवढी घाबरली होती कि तिथेच चक्कर येऊन पडली.

“बापरे हीला काय झालं ??” मी पुढे होऊन तिला उचललं!!

“तनु तू तिच्या सोबत झोप आणि तिला आत्ताच काही विचारू नको.” गीरी ही थरथरत्या आवाजात म्हणाला.





सगळयांचे चेहरे गंभीर झालेले त्यावर भिती स्पष्ट दिसत होती. जरा वेळाने ती शुद्धीवर आली...

“आ.. आई ते बघ ते पुन्हा आलं ते मला सोडणार नाही आई. !! आई मला खुप भिती वाटते. मला वाचव आई. मला वाचव.” ती बराच वेळ थरथरत रडत होती.

रात्रभर घरातल्या लाईट्स चालू होत्या. त्या रात्री कुणीच झोपलं नाही. मी आणि आत्तु गौरीसोबत माझ्या रुममधे होतो. तिला एकटं सोडण्याचा प्रश्नच नव्हता. रात्रभर ती भितीने इकडेतिकडे भीरभिरत्या नजरेने पहायची. थोड्याशा आवाजानेही दचकून उठायची.. माझी स्थितीही काही वेगळी नव्हती.. तिने काय पाहीलं देव जाणे.. पण ती किंकाळी माझ्या पुरती कानात बसली तिला असं पाहून मी नक्कीच हादरून गेलेली

कशीतरी सकाळ उगवली. घरात सगळे चिंतेत दिसत होते. कुणाची तरी वाट पाहत असल्यासारखे. थोड्या वेळाने कुठलेसे एक स्वामी आले.. त्यांनी पुर्ण घर पाहीलं. बराच वेळ ते शांत होते. सगळे जणु काही त्यांचा शब्द ऐकायला आतुर झालेले. त्यांनी पुन्हा आपले डोळे झाकले आणि बराच वेळ मंत्रौच्चारण केल्यावर त्यांनी डोळे ऊघडले

“या घरात काहीतरी अघटीत घडलंय. मुलीवर मृत्युची छाया दिसतेय. सांभाळून रहा. लवकरच काही केलं नाही तर विनाश अटळ आहे..”

“स्वामी काय करायला हवं मार्ग दाखवा!!” आत्याच्या चेहऱ्यावर भिती आणि चिंता याचे संमीश्र भाव होते.

“शांती करायला हवी!! मी परत येईन तोपर्यंत हा धागामुलीच्या गळयात बांधा..” त्यांनी आत्याच्या हातात धागा दिला. तिने लगेचच तो गौरीच्या हातात बांधला.

“आताथोडे दिवस तरी काही भिती नाही” आत्या गौरीच्या डोक्यावर हात ठेवत म्हणाली..





दुपारी सगळे निवांत झाल्यावर मी हळुच विषय काढला. नक्की काय पाहिल गं रात्री?? तिच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा भितीची लहर दिसली.

“मला खुप भिती वाटते गं!!” तरी तिने थरथरत सांगायला सुरवात केली. “अगं रात्री ना मला वाचता वाचता झोप लागली. रात्री दोन वाजता खिडकिपाशी काहीतरी खट्ट वाजल मी दचकून ऊठले खिडकीत पाहीलं तर काहीच नव्हतं, जशी मी मान वळवली तसं मला समोर ते दिसलं!!”

“क... काय दिसलं???” इकडे माझी धडधड वाढली.

“कुणीतरी भिंतीपाशी उभं होतं. अंधारातही ते मला स्पष्ट दिसत होतं..” गौरीने माझो हात घट्ट पकडलेले पण तिच्यापेक्षा माझे हात जास्त थरथरत होते.. ती सांगत होती “लालबुंद डोळे चमकत होते” मी जोरात भु... त अशी किंकाळी मारली. पण भितीने माझ्या तोंडून आवाजच निघला नाही.. मी तशीच आ वासून ऊभी होते मी गच्च डोळे मिटून घेतले आणि पुन्हा जोराचीं किंकाळी फोडली. मग जाग आली तर तुम्ही सगळे मला ऊठवत होते. आणि हे पहील्यांदा नाहिए माझ्या बाबतीत ही दुसरी वेळ आहे !!!”

“म्हणजे?? तुला भुतं दिसतात का??” मी शक्य तेवढा आवाज शांत ठेवत म्हणाले.

“पंधरा दिवसांपासून हे असं होतंय. दर वेळी वेगळं काहीतरी. आईला यात बुआबाबाच काहीतरी करु शकतील असं वाटतं. तर दादाचा यावर विश्वास नाही!! घरातले सगळेच काळजीत पडलेत. दादाचं पण जॉबसाठी जॉईनींग लेटर आलंय. माझ्यामुळे तो जायला तयार नाही होत.. साधारण पंधरा दिवसांपुर्वी याची सुरवात झाली. माझी फाईनल एक्झाम चालू होती. म्हणून अभ्यासासाठी मी जास्त वेळ जागायची. रात्रीचे साधारण एक वाजले असतील, मी अभ्यास करत होते..”



ती सांगत तर होती. पण माझी भितीने गाळण उडाली. मी गौरीचा हात अजूनच घट्ट पकडला.. ती सांगत होती, “माझं आजुबाजुला लक्ष नव्हतं. अचानक कुणीतरी माझ्या मागून मला दुसऱ्या खोलीत गेल्यासारखं वाटलं. मी मागे वळून पाहीलं. तर अचानक माझा श्वासच थांबला. कुणीतरी हवेतला ऑक्सीजनच काढून घेतल्यासारखं वाटायला लागलं. माझा आवाजच निघेना. कुणीतरी श्वासही घेता येणार नाही एवढं घट्ट आवळून धरल्यासारखं वाटायला लागलं. अंग अगदी थंड पडलेलं. घामाने ओलीचिंब झाले तरी तोंडून शब्द निघेना, जसं कुणीतरी माझा आवाज दुसऱ्यापर्यंत पोहोचण्यापासून रोखत असावं.. जवळजवळ अर्धा तास हे चालू होतं. मला तर आताच माझा जीव जातोय कि काय असं झालं होतं.. पण नंतर हळुहळु तो फास हलका झाला. तेव्हा कुठे माझा आवाज निघाला... खरंच मला एवढी भिती वाटलेली ना कि शब्दात सांगण अवघड जातंय!!”

“असुदे! नको बोलु त्या विषयावर. तुला ऊगीचच भिती वाटेल!!” मी असंच धीटपणाच उसनं अवसान आणून तिला म्हणाले. पण आता मला एकटीला किचनपर्यंतही चालत जायची भिती वाटायला लागली..

मी स्वतःशीच म्हटलं यार होस्टेल ला किती भारी होतं ना!! नेहमी गॅंग सोबत असायची कशाला घाबरण्याचा तर प्रश्नच नव्हता. उलट आम्ही केलेल्या कारनाम्यांमुळे फुल टु टुक्कार गॅंग म्हणून फेमस होतो. आणि मी या गॅंग ची लीडर.. पण आता कुणी सोबत नाही.. इथलं हॉरर वातावरण पाहून परत निघावं असं वाटायला लागलं...

देवा वाचव सगळ्यांना!!!!मी मनातच देवाला सांगीतलं. चार-पाच दिवस काहीच घडलं नाही.. आत्या गीरीला म्हणाली अरे तनु बिचारी घरात कंटाळली असेल!! तू आणि गौरी जाऊन जरा फिरवून आणा तिला!! मी तर लगेचच तयार झाले.. मग पुन्हा मी गौरीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहीलं. आत्यालाही माझा प्रश्न कळला असावा बहुतेक, ती माझा प्रश्नार्थक चेहरा बघताच म्हणाली.. जे काही आहे ते घरात





आहे बाहेर काही भिती नाही.. आणि स्वामीजींनी दिलेला धागा आहेच सोबत.. निश्चिंत होऊन जा. स्वामीजी तुमच्यासोबत आहेत!!

दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही तिघे निघालो. गाडीत मी आणि गीरी पुढे आणि गौरी मागे बसलेली... बराच वेळ आम्ही दोघीच बोलत होतो.. म्हणून मग मी त्याला चिडवत भुवया उंचावत म्हणाले.. “काय रे लाडु एवढा शांत का बसलाय ??”

“मी काय लाडु दिसतोय तुला चिंगे!!!”

“मला चिंगे नको म्हणु..” मी नाक फुगवून म्हटलं..

“मग मला लाडु म्हटलेलं चालतं ना??” पुन्हा दोघेही गाल फुगवून बसलो.

मधेच गौरी शांततेचा भंग करत म्हणाली..

“झालं लाडु चचिंगीबरोबर भांडण!!!!”

“ए तू गप हा!! चिचुंद्रे!!!” हे वाक्य आम्ही दोघेही अगदी चिडून एकाच वेळी बोललो. मग दोघांनींही हसून एकमेकांकडे पाहीलं. आता गाल फुगवून बसायची वेळ गौरी ची होती. आम्ही मात्र यावर खुप हसलो. लहानपणी याच नावांनी आपण एकमेकांना चिडवायचो.. किती मजा यायची ना तेव्हा!!

मला जुन्या गोष्टी आठवून आपोआपच हसु आलं.. “हो आणि तू कशी एकदा गच्चीवर झोपून गेलेली तुझ्या आवडत्या कोपऱ्यातल्या जागेवर. तासभर घरात शोधाशोध केली तेव्हा सापडली... !!”

“हं..... म मस्त होतं ना लहानपण!! गच्चीवरून आठवलं गौरी हा काल गच्चीत ऊभा होता!!! “त्याने माझ्याकडे केविलवाण तोंड करून पाहीलं..

“मला असंच लोकांना सतवायला खुप आवडतं!!”

“हो का मग काय नेहमीच जातो तो.” गौरीने पुन्हा मधे खडा टाकला...





"अगं तसं नाहि....." आता गीरीच्या कपाळावरचा घाम मला स्पष्ट दिसत होता.. असं कुणाच घाबरण म्हणजे माझ्यासाठी अतिउच्च आनंदाचा क्षण असायचा..

"अगं म्हणजे... तुला माहीतीए का हा दहावित असताना तिथे बसून लव्ह लेटर लिहायचा!!"

मी दुसऱ्या मुद्दयावर बोललेली पाहून त्याचा एवढा वेळ दबलेला श्वास त्याने मोकळा केला..

"अस्सं होय? कुणाला पत्रं लिहायचा रे दादा??" गौरीने प्रश्न टाकला..

"अगं!! लिहायचो खरा. पण तिला ती पत्रं कधी दिलीच नाही.. हीम्मतच नाही झाली!! माझ्याच वर्गात होती ती. प्राजक्ता नाव होतं तिचं. त्या नंतर कधी भेटलीच नाही. यार जर आता ती भेटली ना सरळ लग्नच करून टाकिन तिच्याशी!!!" गीरी रस्त्यात आलेले खड्डे चुकवत झोकदार वळण घेत त्याची स्टोरी ऐकवत होता..

"ओह हो.. तू लग्न करशील खरा पण ती नको का हो म्हणायला??" आम्ही एकमेकिंना टाळी देत खिदळलो..

"का नाहि म्हणणार तिलाही मी आवडायचो.."

"तिला लाडु खुप आवडत असतील नाई... ???"

" हो हो खुप आवडायचे आणि अजूनही आवडतात!!"

"अजूनही म्हणजे??" मी जरा जास्तच उत्सुकतेने विचारलं. नंतर मलाच असं वाटलं यार थोडा पॉज तर घ्यायचा!!! जाऊदे!!

"अजून म्हणजे फेसबुक ला भेटली!!" तो चक्क लाजला. एवढी चीड आली ना त्याची.. पण मला का चिड यावी??? सोड.. 'तनु सोड' मी चिडल्यावर असं स्वतःला सांगत असते..

"बरं आडनाव काय तिचं???" माझा पुन्हा तोच ऊत्सुकतेचा प्रश्न...





मी ना फारच बुद्धु आहे... पॉज घ्यायचा होता ना!... मी नकळत कपाळावर हात मारला..

“ओह म्हणजे तुम्ही तिला आधीच माझ्याविषयी भरभरून सांगा. म्हणजे मग जमलच!”

“नाही रे दादा नाही सांगणार...” गौरी त्याला म्हणाली! तो मोठ्याने हसला

“ए जास्त हसु नको. पुढे बघ खड्डयात घालशील..” त्याने रस्त्याकडे पाहून फक्त भुवया उंचावल्या.. कारण अगदी चकचकित गुळगुळीत रस्त्यावर खड्डा कुठेय हाच प्रश्न होता..

दुपारपर्यंत बरंच फिरून आम्ही घरी आलो घरात पाऊल ठेवताच पुन्हा तो हॉरर फिल आला... बराच वेळ याला फोन लाव त्याला फोन लाव तोंड दुखेपर्यंत बोलणं झालं... शेवटचा फोन ठेवत पुन्हा पाचव्यांदा मी तेच वाक्य पुटपुटले यार लाडुने आडनाव नाही सांगीतलं... अरे???? मला काय करायचंय काही असो मी का एवढा ईंट्रेस्ट घेतीये??? मी स्वतःवरच ओरडले.... ओके मीस तनुजासंध्याकाळ व्हायला आलीय दिवा बत्तीची वेळ झाली!!!

आता हे दिवाबत्ती आत्ता आत्ताच सुरु केलं मी. माझ्या खोलीत रोज रात्री दिवा जळायला लागला. रोज रात्री रामरक्षा आणि हणुमाण चालीसा वाचून झोपायला लागले. तसा माझा या सगळया गोष्टींवर विश्वास पण नाही सेफ़टी म्हणून.. !!आत्तु आधीच गौरीलासोबत तिच्या खोलीत झोपत होती.. मग एकटं झोपणच जास्त पसंत केलं कारण गौरीची त्या दिवशीची किंकाळी कानात अजूनही घुमत होती. मनात म्हटलं जाऊदे तसं पण तिलाच दिसतं ना असं काही. मग आपण बाजुलाच रहावं...

आता हे सगळं केल्यावर तसलं काही दिसत नाही यावर माझा पुर्ण विश्वास बसायला लागलेला.. पण तो ही अल्पायुषी ठरला.. शेवटि मलाही त्या गोष्टीचा प्रत्यय आलाच जिच्यापासून मी वाचण्याचा प्रयत्न करत होते..





रात्री अचानक कुणीतरी दरवाजा वाजवला. मी ताडकन उठले. तनु!!!! बाहेरून आवाज आला. हा तर आत्तुचा आवाज आहे.. मी घाईघाईतच दरवाजा खोलला. खोलीतली लईट चालू होती पण बाहेर पुर्ण घरात अंधार होता. तरी अंधुक प्रकाशात दिसत होतं. इकडेतिकडे नजर फिरवली बाहेर कुणीच नव्हतं. आआत्तु!!!!!! आत्तु... बाहेर कुणीच नाही बघून मला तर घामच फुटला.. पुन्हा धीटपणाच उसनं अवसान आणत मी स्वतःशीच म्हटलं भास असेल माझा तसंही असं काही नसतं !!!

मी गौरीच्याखोलीवर टकटक केली.. आत्तुने डोळे चोळत दरवाजा उघडला “काय गं तनु????? काही हवंय का???” ती आळस देत विचारलं..

“तू आवाज दिला का????”

“नाही तर मी तर आत्ता उठलेय!! का गं काही आवाज आला का तुला तसं काही वाटत असेल तर आमच्यापाशी झोप..”

“न... नाही – नको. तसं काही नाही. मला भास झाला असेल..” मी झोपलेल्या गौरीकडे एकदा पाहीलं आणि परत माघारी माझा खोलीकडे फिरले.

आत्तुने दरवाजा बंद केला जाता जाता माझं सहज जीन्याकडे लक्ष गेलं. अंधुक प्रकाशातही मला बऱ्यापैकी दिसत होतं.. हॉलमधे कुणीतरी उभ होतं..

मी थोड पुढं जाऊन निट निरखून बघीतलं. अरे आत्तु??? आत्ता तर तिने माझ्यासमोर दरवाजा लावला. थोडी पुढे सरकले.. पुन्हा मनात आलं आवाज द्यावा. तसल काही असंल मग??

हळुच म्हटलं “आत्तु!!”

ती माझ्याकडे पाठ करून होती..

मी पुन्हा आवाज दिला “आत्तु!!”





काहीच उत्तर नाही..

अचानक तिने माझ्याकडे तोंड केलं ते पाहून भितीने तर माझी बोबडीच वळली. तिच्या साडीचा पदर जळत होता. त्या लाल उजेडात तीचा चेहरा अजूनच भेसुर दिसायला लागला. ते मोकळे केस आणि पुर्ण पांढरा फटक चेहरा.. ती हळुहळु माझ्याकडे सरकायला लागली... अई ग... माझ्या ना गळयात भितीचा गोळा अडकला.. आईं... मी जोरात किंकाळी फोडली.. पण तरी मला समोर दिसत होतं ती होती. नंतर कसला उबट वास आला आणि माझे डोळे आपोआप झाकायला लागले.. “वा..... च...... वाआआआआआआ.”

मला जाग आली ती सकाळी दहा वाजता बापरे मी एवढ्या वेळ झोपले होते!! डोक जड झालेलं.. मी सरळ किचन मधे गेले

.. अरे मला काय होतंय?? मी गौरी आणि आत्तुला रात्री बद्दल विचारलं... सगळे माझ्याकडे आश्चर्याने पहायला लागले..

“कशाबद्दल बोलतीय तू? काहीतरी स्वप्न पडलं असेल बहुतेक.” आत्तु पोळी उलटत म्हणाली...

“म्हणजे रात्री मी तुझी रुम ठोठावली. तू माझ्याशी बोलली..” मी पुन्हा गोंधळून विचारलं.

“नाही गं. तू तर काय, रात्री कुणी आलेलं मला तरी आठवत नाही..”

“ अरे?? आता हे काय नविन?” मलाच प्रश्न पडला..





“देवा रे. ए आत्तू मी नाही थांबणार इथे. मी चालले परत मुंबईला.. मला नाही रहायचं..” मी तिथेच रडायला सुरवात केली..

“अगं रडतेस काय लहाण बाळासारखी!!” आत्तु ने माझ्या पाठीवरून हात फिरवला..

“मी दादांना फोन करते..” तिचं पप्पांशी बोलणं झालं.. त्यांच काय ठरलं काय माहीत? तिने मला ऊद्याच तुला पाठवून देते असं सांगीतलं. आज स्वामीजींना विचारून घेऊ सगळं इथेच थांबलेलं बरं..

दुपारी पुन्हा स्वामीजी आले. त्यांनी पुन्हा एक धागा दिला.. तो मात्र मी कुठलीही कानकुच न करता गळयात बांधला.. दिवसभर मी त्या दोघींना कुठे जाऊ दिलं नाही.. आता रात्री मात्र झोपायचं नावच येईना.. कधी एकदाची या भुत बंगल्यातुन बाहेर निघतेय असं झालं..

पण त्या बुआच्या तर.... “तुम्ही काही दिवस बाहेर जाण्याचा प्रयत्न करु नका नाहीतर तुम्हाला धोका होऊ शकतो... परवाच्या पौर्णीमेला हे सगळं थांबवेन माझी साधना चालू आहे. तोपर्यंत कुणी बाहेर पाऊल ठेऊ नका!!!”

आता हे काय नविन?? पण आत्तू मला जाऊ देईना चक्क बाबासुद्धा म्हणाले “आम्ही तुला घ्यायला येतो. तिथेच थांब.”

आता कसं होणार? असं अडकून पडल्यासारखं झालं.. आता तर छोट्या छोट्या गोष्टींची भिती वाटायला लागली.. आत्तु आपण सगळे जाऊया इथून इथे नको रहायला.... आत्तुने फक्त मान हलवली..

कधी एकदाची ती पौर्णीमा येतेय असं मला झालेलं..





रात्री जेवण वैगेरे झालं आणि आम्ही असंच गप्पा मारत बसलो.. सगळया लाईट्स लख्ख प्रकाश फेकत होत्या.. आणि अचानक लाईट गेली.. मी आत्तुचा हात घट्ट पकडला. अंधारात काहीच दिसेना...

“आआआआत्तु.....ऊऊऊऊऊ”

माझी थरथर वाढली. अचानक लाईट आली आणि समोर जे दिसलं ते पाहून मी बसल्या जागेवरून जवळजवळ चार पाच फुट लांब ऊडी मारली असेल. अगदी माझ्या शेजारी काहीतरी बसलेलं. पांढराफट्टक चेहरा त्यावर ओघळलेलंलाल रक्त डोळयांभोवती काळया वर्तुळांमुळे डोळे खोबणीत गेल्यासारखे वाटत होते.. मी कानांवर हात ठेऊन.. मी जोरात किंचाळले....

तसा मोठ्याने हसण्याचा आवाज आला.. मी हळुच डोळे ऊघडले... सगळे मला पाहून हसत होते..

“पुरे आता...” आत्तुने मला जवळ घेत सगळयांना दम भरला. समोर गीरी होता चेहऱ्यावर भयानक मेकअप छापून तो माझ्या समोर बसलेला... मला पाहून जोरजोरात हसत होता..

“आई.. गं मी किती घाबरले!!!” मी त्याला जोरात चापट मारली..

“हहहहहहहममममम काय मग टुक्कार गँग ची लीडर... झाली का भुत पहायची हौस???” सगळे माझ्याकडे पाहून हसत होते....

माझ्या चेहऱ्यावरचे एक्सप्रेशन अगदी पाहण्यासारखे होते तेव्हा...

“म्हणजे???!!!!!!”

मी पुढे काही म्हणायच्या आतच गौरीने मान डोलवली

“आम्हीच होतो... तुला भुत दाखवणारे!! आत्ता कळलं भिती काय असते ते!! होस्टेल मधे असं काही करण्यात मोठी हिरोपंती वाटायची ना???” गीरी आपलं हसु बळेच आवरत म्हणाला...





"अगं रोज मामांशी तुझ्याविषयी बोलताना ते तुझे कारनामे ऐकत होतो. तुम्ही ग्रूप बनवून जे काही उद्योग करायचात ना त्याला सगळेच वैतागले होते. मग म्हटलं तुला पण जरा अनुभव द्यावा.. आता कळलं ना दुसऱ्यांची काय हालत होत असेल ते.."

मी खाली मान घालून सगळं ऐकत होते... मी अगदीच काही बॅडगर्ल नव्हते पण आमच्या दंगा मस्ती आणि खोड्यांमधे आम्हाला काहीच वावग वाटायचं नाही.. पोरींना अशीच भुत दाखवून घाबरवायचो. टाईमपास म्हणून. रॅगींग पण करायचो.. यात फक्त गंम्मत वाटायची.. धिंगा, मस्ती, दादागीरी खुप चालायची.. बाबांकडे माझ्या अशा खुप साऱ्या कंपलेंट्स यायच्या. पण त्यांच बोलणंही मी कधी मनावर घेतलं नव्हतं.. पण यांनी मात्र मला चांगलीच अद्दल घडवली.... सगळे मला असं बसलेलं पाहून हसत होते...

मग मला अजूनच रडायला आली. "आत्तु काय गं तू पण!!" मी नाकओढत म्हणाले.

"अगं नाही गं. मी तर यांना नकोच म्हणत होते. पण माझं ऐकत कोण.. या दोघांचाच आहे सगळा ऊपद्व्याप.. माझं काही नाही..."

"मग रात्री कशी माझ्याशी बोलून तू लगेच खाली आली??"

"अगं ती आई नाही. मी होते वाटते ना आईसारखी??" गौरी हसत म्हणाली.. "बराच खटाटोप केला. ते साडीला आग लावणं जरा रिस्किच होतं.."

"मी तर तुला आत पाहीलेलं. तू तर आत झोपलेली ना. मी पाहीलेलं!!"

"अगं ती मी नाही दादा होता. त्यानेच मागून येऊन स्प्रे मारला आणि तू बेशुद्ध पडली. इकडे आमची तो पेटलेला पदर विझवायला किती धावपळ झाली माहीतीये??"

मला रडता रडता ही हसायला आली..





“म्हणजे बाबासुद्धा यात सहभागी होते तर!! म्हणजे बराच प्लान केलेला दिसतोय..”

“तुझ्या बाबांना याबद्दल सांगीतलं तर त्यांनी सुद्धा फुल परवानगी दिली....”

झालं! आतामला चिडवायला सगळ्यांना नविन विषय मिळाला.. आणि विशेष म्हणजे माझी प्रत्येकवेळी झालेली घाबरगुंडी प्रत्येकाने पाहीली होती.. एरव्ही शांत असणारा गीरी सुद्धा किती बडबड करत होता.. मला अचानक आठवलं...

मग मीआत्तू कडे पाहत म्हटलं.. “अगं पण मग तुझा तो स्वामी कोन होता??”

“अगं तो गीरीचा मित्र साहिल.. तो बघ लहानपणी खेळायला यायचा तुमच्यासोबत आपल्या शेजारीच रहायचा!!” गौरी म्हणाली..

“हो त्याला आपण सांबा म्हणायचो..” मला ही तो आठवला..

“ए काही म्हण. पण गौरी तू बाकी सॉलीड अॅक्टर आहेस हा..” रात्री कितीतरी वेळ गप्पा मारल्या...

“अगं तुझी अजून थोडी मजा घेणार होतो.. पण आईने करून नाही दिलं. तसाही दादा परवा जाणार आहे..”

“जाणार??? कुठे जाणार???” मी पाठोपाठ म्हणाले.

“अगं तुला म्हणले होते ना त्याच्या जॉईनिंगचं. तर परवा तो निघतोय बॅंगलोरसाठी.”

खरं सांगु मला ना तेव्हा असं वाटलं कि त्याने जाऊ नये. तो केव्हाच त्याच्या खोलीत गेलेला.

मी उठत म्हटलं “मी जाते झोपायला...” आणि मी पळतच माझ्या खोलीकडे निघाले. जरा वेळ तशीच लोळत पडले.. पण झोप काही येईना. रात्रीचे साडे अकरा





झाले असतील. मग मी लांब लांब ढांगा टाकत जीना चढून गच्चीकडे निघाले. तिथे पोहचून माझ्या जागेकडे जायला निघाले तोच मला गिरी दिसला...

"अरे तू इथे गच्चीवर काय करतोयस ??" मी त्याला आवाज देत म्हणाले..

"काही नाही गं. असाच आलेलो. येतो असंच निवांत व्हायला. तू अजूनही तसंच बोलते गच्ची अगदी गोड सुर लावून..."

"हहहहममम. तुला माहीतीए गच्ची ही लहानपणापासूनची माझी सगळयात आवडती गोष्ट. हसताना रडताना.. माझ्या मनातली प्रत्येक गोष्ट ही मी तिच्यासोबत शेअर केलेए. मग ती घरची असो किंवा कुठलीही. अगदी होस्टेल च्या गच्चिवर ही मी तासनतास आकाशाकडे पाहत बसायची.. मला गच्चि हे नावच खुप आवडतं.. माझ्याच नाही तर सर्वांच्याच आठवणी आहेत या गच्ची सोबत.." मी थंड वाऱ्याची झुळुकेचा थंडावा चेहऱ्यावर साठवत म्हणाले..

"तू होती तशीच आहे अजून कधीकधी खुप समजुतदार वाटते तर कधी कधी खुप बालीश.. मला ना तुझं कळतच नाही....."

"माझं ना कुणालाच कळत नाही.. !!" मी त्याच बोलणं मधेच तोडत म्हणाले.. "बरं मग मग कधी निघतोय??"

"परवा सकाळी निघायचं म्हणतोय.... यार खुप दडपण आलंय मला.."

"आता यात कसल दडपण??" मी हसत म्हटलं..

"अगं तसं नाही उद्या जायच्या आधी मी तिला पहील्यांदा समोरासमोर भेटणारे आणि फाईनली एवढ्या वर्षांची माझी लेटर्स तिला देणार. तनु मी उद्या तिला प्रपोझ करणारे.. खुप दडपण आलंय ग. पहीलीच वेळ आहे ना. शाळेत असल्यापासून ती मला आवडायची लपून लपून पहायचो तिला लेटर्स लिहायचो आता लव्ह लेटर नक्की कसं असत अजिबात माहीत नव्हतं तरी लीहायचो.. पण भावना खऱ्या होत्या





पण आता सरळ बोलूनच टाकतो प्राजु माझं तुझ्यावर खुप प्रेम आहे, .. नाही हे नको.. प्राजक्ता आय लव्ह यु.. !!नाई हे नको.. कसं बोलु?? तनु.. !!! तनु???"

त्याने मला जोरात हलवलं. मी कुठल्याशा विचारांत हरवले..

"ए.. हो बोलेल ना गं ती???" त्याने माझ्याकडे गंभीर मुद्रेने पाहीलं,

"अं.. हो मग नाही कशाला म्हणेल ती?? एवढा राजबिंडा दिसतोस... डोंन्ट वरी ती नक्की हो म्हणेल.. बेस्ट लक!! तुला..."

"थँक्स तनु.."

"बरं मला ना खुप झोप येतीए. चल मी पळते आता झोपायला.. बाय गुड नाईट.."

"हो हो गुड नाईट... मला तर आज रात्री झोपच येते कि नाही!!" तो डोकं खाजवत म्हणाला.

मी माझ्या खोलीत येऊन पडले. बराच वेळ मला झोप येईना. हा म्हटला खरा त्याला रात्री झोप नाही येणार. त्याच माहीत नाही. पण माझी झोप मात्र नक्कीच उडालेली.. म्हणजे काय यार! पहील्यांदाच माझ्या बाबतीत असं घडत होतं. मी इथे आल्यापासून मला काय झालंये माझं मलाच कळेना.. त्याने लांब जाऊ नये असं वाटतं. तो दुसऱ्या मुलीबद्दल बोललेलं मला आवडत नाही. स्वतःशी एकटिच हसते. असं वाटतं तो नेहमी जवळ असावा. पण त्याच्या मनात तर काहीतरी वेगळंच होतं. आमच नातही असं होतं पण. मी फक्त गमतिने चिडवण्यापुरतीच मर्यादित राहीले.. माझे डोळे हलकेच पाणवले.. मला प्रेम झालंय का??? मी स्वतःलाच प्रश्न विचारला.. No Way... हे प्रेम बिम काही आपल्यासाठी नाही मला जमणारच नाही हे.. त्याने त्याचा रस्ता निवडला बरं झालं!!

Just forget it... मी स्वतःशीच म्हणाले.. मी ऊशीत तोंड घुपसल.. म्हणजे माझेच हुंदके मला ऐकायला येऊ नये म्हणून.. ती बिचारी ऊशी सद्धा बिचरी





भीजून चिंब झाली...... इतिहासातली खुप मोठि घटना तेव्हा घडली.. मी रडले!! नेहमी दुसऱ्यांना रडवणारी मी आज कुणासाठीतरी रडले... रात्रभर मला झोप आली नाही. मी पहील्यांदाच कुणासाठीतरी रडले..

सकाळी चहा घेता घेता आत्तु माझा चेहरा पाहून म्हणाली काय गं तनु डोळे का असे सुजल्यासारखे झालेत? झोप नाही झाली का?...

“काही नाही गं असंच, थोडे लाल झालेत.. !!” मी अशीच थाप मारली..

“तब्येत तर बरोबर आहे ना तुझी??”

“हो गं. मला काही नाही झालं.. ठिक आहे मी.. एवढी नको काळजी करु” मी जरा वैतागूनच म्हटलं..

“तुझं आपलं असंच. काही काळजीने म्हणावं तर!!” ती तनतनतच आत गेली..

“तनु.... !!!” मागून आवाज आला.. गीरी मला आवाज देत होता.. “माझ्यासोबत येशील संध्याकाळी?? मला तेवढाच आधार वाटेल..”

“मीच का? गौरीला का नाही नेत??”

“नाही नको. तुच चल!!!”

“झालं तेवढं बास नाही का कि मला अजून त्रास देतोय..” माझ्या अगदी ओठांवर येऊन राहीलेलं वाक्य मी तसंच गिळल. मी मानेनेच 'हो' म्हटलं!!

संध्याकाळी जायच्या वेळेला मी जवळजवळ दिड तास आवरून बसलेली पण हा काही बाहेर निघायला तयार नव्हता..

मी तिसऱ्यांदा आवाज दिला..





मग तो आला. त्याने फ़ॉर्मल शर्ट आणि पॅंट घातलेली. खुपच छान दिसत होता. आम्ही लगेचच निघालो.. एका बागेत भेटायचं ठरलेलं. प्राजक्ता मला ओळखत नव्हती. मग तिथेच बाजुला बसणार होते. तसं त्याने मला सांगूनच ठेवलेलं.. जशी काय कुणीतरी अनोळखी आहे असं.. आम्ही अशाच हिशोबाने अंतर ठेऊन बसलो...

"यार किती वेळ अजून?? माझा तर टेन्शन ने बिपी वाढायला लागलाय.." त्याने तिसऱ्यांदा विचारलं..

"अरे हो येईल ती.. थोडा वेळ पण दम नाही निघत का तुला??" मी चिडून म्हटलं.. मनात वाटत होतं तिने येऊच नये.. पण मी एखादी इच्छा धरावी आणि ती पुर्ण व्हावी असं माझं नशीब कुठलं!!

कारण आमच बोलणं व्हायला आणि ती यायला एकच गाठ पडली...

तिला येताना पाहून तो अजूनच सावरून बसला.. ती येणार नाही हाही आशेचा धुसर किरण पुसला गेला. गुलाबी कलरचा पटियाला घातलेला तिने.

मी गीरीकडे पहात म्हटलं "मस्त आहे हा चॉईस.."

त्याने ही हसून प्रतिसाद दिला... ती आली. बराच वेळ इकडचं तिकडचं बोलणं झालं आणि त्याने तिला प्रपोज केलं.. आणि त्याने खिशात आणलेली ती लेटर्स तिच्यापुढे केली..

तिने क्षणभर त्या पत्रांकडे पाहीलं आणि म्हणाली.. "सॉरी गीरी मी हे नाही स्विकारु शकत. एक मित्र म्हणून तू माझ्या खुप जवळचायेस. पण यापेक्षा जास्त मी कधी विचारच केला नाही.."

ओह! यापुढे मला गीरीला नक्कीच पहावलं नसतं.. मला आनंद व्हायला पाहिजे होता; पण नाही झाला. खुप वाईट वाटलं तेव्हा.. घरी येताना एक शब्दही बोलणं झालं नाही. तो पळतच आत निघून गेला.. मी मात्र गाडीतच बसून होते..

अचानक माझं लक्ष गेलं. ती पत्रं तो गाडीतच टाकून गेलेला.. मी त्यातलं एक हळुच उचललं.. वर लिहीलं होतं





प्रिय तनु..... माझं नाव?? मला झटकाच बसला.

"प्रिय तनु बोलायची हिंम्मत होत नाही म्हणून पत्र लिहीतोय, ...."

ते वाचून मला दुसरा झटका बसला. मी तिथं पडलेली सगळी पत्रं ऊघडून पाहीली. थोड्याफार फरकाने त्यात तेच सगळं लिहीलेलं होतं.. प्रिय. तनु. म्हणजे???!!? ही सगळी पत्रं?? आता मात्र मी या लाडुचा जीव घेईन, . मी जोरात पळत गच्चीवर पोहोचले..

मला माहीत होतं गीरी तिथेच असणारय.....

“डफर ईडीअट...... मी तुला सोडणार नाही लाडु.." मी त्याला सटासट मारायला सुरवात केली. तरी पण बावळट सारखा तो हसत होता.. त्याने माझे दोन्ही हात पकडून धरले.. अरे हो... किती मारशील!!! तो हसत म्हणाला... किती धक्के द्याल मला सरळ सरळ सांगता येत नव्हतं का किती त्रास दिला.... मजा वाटते ना मला रडवायला?? मी दोन्ही हातात माझा रडका चेहरा लपवला..

त्याने मला हळुच मीठीत घेतलं.. मी तसंच तोंडावर हात ठेऊन होते.. तो माझं लपवलेलं तोंड तो स्वतःकडे करत म्हणाला.. "अगं रडतेस काय अशी वेडाबाई. तुला मी पहील्यांदा मला कुणीतरी दुसरी मुलगी आवडते हे सांगीतलं तेव्हाच मी म्हटलं.. भाई तू सही रास्ते जा रहा है!!. हवं तर सॉरी पण इतक्या सहज तू थोडी पटली असती..."

"हो ना तुला पटवणं म्हणजे काय सोपी गोष्ट होती..?" मागून आवाज आला. आत्या आलेली.

"आत्तू तू पण ना,”. मी तिच्या गळयात पडले!!!

पाठोपाठ सगळेच आले गौरी.. मामा, आणि पाठोपाठ प्राजक्ता आणि साहीलही..





"तुझ्या बाबांनी दिलेली दोन्ही कामांमधे यश आलं."

"म्हणजे यात सुद्धा बाबा सामील होते तर!!!.."

"मग काय, ... त्यांनी सरळ सांगितलेलं तनुने जर होकार दिला तर मुलगी तुमची. गिरी तर केव्हाचा तयार होता." ते दोघेही हसत म्हणाले..

हे दोघेही माझे बेस्ट फ्रेंड आणि ही आईडीया हिचीच होती.... गीरीने त्या दोघांशी नव्याने ओळख करून दिली.. चला प्रत्येकाने आपापली कामं व्यवस्थित केली.. त्याबद्दल थँक्स.. तो टाळी वाजवून सगळयांच लक्ष वेधत म्हणाला..

तेवढ्यात मला काहीसं आठवून मी म्हणाले.. "एक मिनीट", सगळे माझ्याकडे पहायला लागले...

“आता हे तर काही नाटक नाहीए ना.... ????”

माझा केविलवाणा चेहरा पाहून सगळेच हसायला लागले, ..........

...... END....





# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,



पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान